**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**
**जनसंपर्क विभाग**

# मध्य विभाग अन्वेषण संशोधन महोत्सवामध्ये विद्यापीठ अन्वेषण चमूचे घवघवीत यश

## कुलगुरूंचे हस्ते सत्कार

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ आविष्कार स्पर्धेतील विजेत्या संशोधकांनी कलिंगा विद्यापीठ, रायपूर, छत्तीसगड येथे नुकत्याच संपन्न झालेल्या मध्य विभाग अन्वेषण संशोधन महोत्सवामध्ये सहभागी होवून घवघवीत यश संपादन केले. या सर्व संशोधक विद्यार्थ्यांचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी विद्यापीठाच्यावतीने त्यांचे कक्षात सत्कार केला. यावेळी रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. आनंद अस्वार, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, चमू व्यवस्थापक डॉ. सुजाता काळे, डॉ. जयंत वडतकर उपस्थित होते.

पारितोषिक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये विद्यापीठाच्या जीऑलॉजी विभागाचा प्रतिक किशोर देशमुख याने कृषी तंत्रज्ञान गटातून प्रथम क्रमांक मिळविला. त्याचा शेतीतील व बागातील झाडांचे नुकसान करणारी व तब्बल सतरा देशात झपाट्याने विस्तारत असलेली घातक अशी मोठी गोगलगाय नियंत्रित करण्यासाठी आज कुठलेही तंत्रज्ञान उपलब्ध नाही. गोगलगायी वर नियंत्रण मिळविण्यासाठी जगातील पहिला रसायनमुक्त उपाय शोधून काढला असून हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांसाठी कमी खर्चात उपलब्ध करुन देता येवू शकते, असा विषय होता. श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाचा मुकुंद सागर फिसके याने मानव विज्ञान व समाजशास्त्र गटातून प्रथम क्रमांक मिळविला. त्याचा मेळघाटातील लाकूड विघटन करणाऱ्या बुरशीचा उपयोग करुन मेळघाटातील आदिवासींच्या कुपोषणावर मात करण्यासाठी कमी खर्चात उपलब्ध होवू शकणाऱ्या औषधाची निर्मितीवर संशोधन, हा विषय होता.

विद्याभारती महाविद्यालय, अमरावतीचा प्रथमेश विजयराव निकम याने अभियांत्रिकी व तंत्रज्ञान गटातून द्वितीय क्रमांक मिळविला. त्याचा कर्णबधिरांसाठी नाकाच्या हाडाच्या माध्यमातून ऐकण्यासाठी चष्मा निर्मिती यंत्र अगदी अल्प खर्चात अगदी तीनशे रुपयापर्यंत निर्माण केल्या जावू शकते, असा विषय होता. विद्यापीठाच्या मायक्रोबायोलॉजी विभागाचा योगेश बाबाराव बेले आणि राधिका अशोक लोखंडे हिने आरोग्य आणि औषधी निर्माण गटातून द्वितीय क्रमांक पटकाविला आहे. यांनी संयुक्तपणे वैद्यकीय उपचारादरम्यान युरिनरी ट्रेक मधील नळीवर होणारे संसर्ग संक्रमण तातडीने माहिती करुन घेण्यासाठीच्या प्रक्रियेवर संशोधन करुन युरिनरी ट्रेक मधील नळीवर संसर्ग होवू नये म्हणून संसर्ग विरोधक नळीची निर्मिती हा विषय होता.

त्यांच्या या गौरवास्पद कामगिरीबद्दल विद्यापीठाच्यावतीने कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर व प्रभारी कुलसचिव डॉ. हेमंत देशमुख यांनी अभिनंदन केले आहे.

---

प्रति,
**जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दि. ०५/०२/२०१९.
दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी